भारतीय गैर न्यायिक
भारत INDIA
रु. 500
FIVE HUNDRED RUPEES
पाँच सौ रुपये
Rs. 500
सत्यमेव जयते
INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ९८८८ 2018 ५०० २६१७२०१९ AP 182780

श्री गजानन भास्करराव जाधव
ट८ माडीटेड आ कि गणेश
अमरावती

संजय विष्णुपंत देशमुख
मुद्रांक विक्रेता ला.क्र.३/१९८६
तहसिल कार्यालय, अमरावती

OFFICE OF THE TREASURY OFFICER
20 AUG 2019
AMRAVATI

# Agreement

**Party No.1 - Shri Gajanan B. Jadhao, Amravati.**
**Party No.2 - Registrar, Sant Gadge Baba Amravati University, Amravati.**

मेस कंत्राटदाराला मुलींचे वसतीगृहाची मेस खालील अटी व नियमांच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१) सदर मेस करारनामा हा करारनामा अस्तीत्वात आल्यापासून ३० जून २०२० पर्यंत राहील. परंतू मेस कंत्राटदाराच्या सेवा विद्यापीठाच्या मते असमाधानकारक असल्यास, त्रृटीपुर्ण सेवा दिल्यास किंवा नियम व अटी चे उल्लंघन झाल्यास सदर करारनामा एकपक्षी रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाने आपल्याकडे राखून ठेवलेला आहे.

२) मेस कंत्राटदारास उपरोक्त मेससाठी अथवा साहीत्यापोटी कोणतीही रक्कम दिली जाणार नाही.

३) मेस कंत्राटदाराने सादर केलेला अर्ज विद्यापीठाने मंजूर केल्यास त्याबाबत कंत्राटदारास पत्रान्वये कळविण्यात येईल. तसेच कोणताही अर्ज कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा फेटाळण्याचा संपुर्ण अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

४) ज्या मेस कंत्राटदाराचा अर्ज मंजूर केला जाईल त्याला सात दिवसाच्या आत मेस सुरु करणे बंधनकारक असेल. त्यांनी जर मेस चालविण्यास असमर्थता दर्शविली, तर त्यांची संपुर्ण अनामत रक्कम (रु.२०,०००/-) जप्त करण्यात येईल.

५) कंत्राटदाराला काही कारणास्तव कंत्राट नेमुन दिलेल्या कालावधीच्या आत मेस रद्द अथवा बंद करावयाची असल्यास त्यासंबंधीचा कंत्राट रद्द करण्याचा तारखेपुर्वी ३० ( तीस) दिवस अगोदर लेखी सुचना सबळ कारणासह वसतीगृह अधिक्षीकामार्फत कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, यांना कळविणे आवश्यक राहील. तसे न केल्यास अटी व नियमानुसार संपुर्ण अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच कंत्राट दिलेल्या कालावधी आवश्यकता पडल्यास वसतीगृह अधिक्षीका विद्यार्थीनींच्या त्या त्या वर्षाच्या परीक्षा कार्यक्रम बघुन आवश्यक तीतके दिवस वाढवू शकतील. परीक्षा कार्यक्रमाला अनुसरुन किंवा अधिक्षीकामार्फत एखाद्या

कुलसचिव
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती.

Scanned By Scanner Go

विभागाव्दारे कार्यक्रमात बदल करण्याची सूचना झाल्यास त्याप्रमाणे विशिष्ट समूहासाठी मेस संदर्भात सेवेत बदल करण्याची सूचना झाल्यास त्याप्रमाणे सेवा देणे, मेस कंत्राटदाराला बंधनकारक राहील.

६) मेसचा कंत्राट दुसऱ्यास हस्तांतरीत करता येणार नाही अथवा पोट कंत्राटदारास नेमता येणार नाही. तसे आढळल्यास योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. अशा परिस्थितीत मूळ कंत्राटदाराची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

७) मेसमधील खाद्य पदार्थाची प्रत तपासण्याचा संपुर्ण अधिकार अधिक्षीका, वसतीगृह कर्मचारी व सदस्य, मेस सल्लागार समिती यांना राहील. मेसचा खाद्य पदार्थासंदर्भात वसतीगृह अधिक्षीका, वसतीगृह कर्मचारी, विद्यार्थी , सदस्य मेस सल्लागार समिती यापैकी कोणाचीही लेखी तक्रार विद्यापीठाला प्राप्त झाल्यास या तक्रारी बद्दल शहानिशा करुन योग्य कार्यवाही करण्याचे अधिकार विद्यापीठाला राहील अशा तक्रारी संबंधात अधिक्षीकामार्फत आलेल्या अहवालवर मा.कुलगुरुंचा निर्णय अंतिम राहील. हा निर्णय मेस कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

८) विद्यापीठाकडे सद्यास्थितीत उपलब्ध असलेले भोजन कक्ष, स्वयंपाकगृह, फर्निचर, विज, पाणी व भांडी तसेच गॅस शेगडी विद्यापीठामार्फत पुरविण्यात येईल. वरील सर्व बाबीचे भाडे पुढीलप्रमाणे भरावे लागेल.

अ) भोजन कक्ष, स्वयंपाकगृह, फर्निचर इत्यादीचे करार कालावधीचे भाडे आकारण्यात येईल. वरील भाडे करार कालवधीसाठी रु.६,०००/- (रुपये सहा हजार मात्र) मेस सुरु होण्यापुर्वी भरणे बंधनकारक राहील.

ब) विद्यापीठाच्या मेस वापरासाठीच्या भांडयाचे व इतर वस्तूचे भाडे आकारणात येईल. हे भाडे करार कालवधीसाठी रु.१०,०००/- (रुपये दहा हजार मात्र) मेस सुरु होण्यापुर्वी भरणे आवश्यक आहे.

क) मेसमधील विज बिल व पाणी करार कालावधीसाठी रु.८,०००/- (रुपये आठ हजार मात्र) आकारण्यात येईल. ही रक्कम कंत्राटदाराने मेस सुरु होण्यापुर्वी भरणे बंधनकारक राहील. विद्यापीठाने जर वेगळे पाणी / वीज मिटर लावल्यास वापरापोटी येणारे योग्य चार्जेस मेस कंत्राटदाराला बंधनकारक राहील.

९) कंत्रादाराने सर्व वस्तू (एगमार्क) असलेल्या किंवा उच्चप्रतीच्या खरेदी करणे बंधनकारक राहील. याबाबत चौकशी करण्याचे अधिकार अधिक्षिका/विद्यापीठाला राहील.

१०) कंत्राटदाराने पुरविलेले खाद्य पदार्थ भेसळयुक्त आहे, असे निदर्शनास आल्यास संबंधीत कंत्राटदार भेसळ प्रतिबंधक कायद्यामधील तरतुदीनुसार कार्यवाहीस पात्र राहील. तसेच त्यांना पुढील कालावधीतील कंत्राटासाठी अपात्र ठरविण्यात येईल. संपुर्ण अनामत रक्कम व इतर सर्व वस्तू जप्त करण्यात येईल.

११) अ) वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थीनींना मेसमधील जेवन घेणे बंधनकारक राहील.

ब) एक महीण्याच्या बिला इतकी अगावू रक्कम (मेस अडव्हान्स) कंत्राटदाराला विद्यार्थीनींकडुन जमा करुन द्यावे लागेल व तसा अहवाल वसतीगृह अधिक्षीका यांना सादर करावा लागेल. मेस कंत्राटदाराच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण व पाहणी करण्याचे अधिकार विद्यापीठाला राहील. मेस कंत्राटदाराला आपल्या आर्थिक व्यवहार विद्यापीठाने दिलेल्या मांडनीबध्द प्रकाराने करणे बंधनकारक राहील.

१२) वसतीगृहातील विद्यार्थीनी शैक्षणिक सहलीस गेल्यास अशा संपुर्ण दिवसाचे खाडे वजा केले जातील. त्यासाठी विद्यार्थीनीने पुर्व सुचना विभागप्रमुखाच्या दाखल्यासह अधिक्षीकामार्फत द्यावयाची आहे.

१३) आजारी विद्यार्थीनींना हलके भोजन पथ्यानुसार देणे बंधनकारक राहील. तसेच विद्यार्थीनींचे आरोग्य हित लक्षात घेता वसतीगृहातील मेसच्या सदस्यांतून सुट देण्याचे अधिकार अधिक्षीकांना राहील.

१४) वसतीगृहात "विद्यापीठाचे" हित संबंध सुरक्षीत राहील याची मेस कंत्राटदाराला दक्षता घ्यावी लागेल. तसेच याबाबत वसतीगृहावर नियंत्रणासाठी आवश्यक असलेली माहीती विद्यापीठाच्या निदर्शनास आणून व वसतीगृह अधिक्षिकाची मदत करुन विद्यापीठाला सहकार्य करावे लागेल. एखादी अनुचीत बेकायदेशिरबाब आढळल्यास मेस कंत्राटदाराने विद्यापीठाला कळवावे.

१५) (अ) दैनंदिन भोजनात खालील पदार्थाचा समावेश राहील. त्यात विद्यार्थीनीच्या हितानुसार व अधिक्षिकांच्या संम्मतीनुसार योग्य तो बदल करण्यात येईल.

| | |
|---|---|
| सोमवार ते शनिवार (सकाळ)<br>वेळ (सकाळी ९.३० ते १२.३०) | १) गव्हाच्या पोळ्या (चपाती)<br>२) भात<br>३) वरण / आमटी<br>४) सुकी भाजी<br>५) रस्सा भाजी / उसळ<br>६) दही / ताक / कढी (मर्यादीत)<br>७) कांदा, लिंबू<br>८) चटणी / लोणचे |
| सोमवार ते शनिवार (संध्याकाळ)<br>वेळ (सांयकाळी ७ ते १० ) | १) गव्हाच्या पोळ्या (चपाती)<br>२) भात<br>३) वरण (फोडणीचे) / हिरव्या पालक भाजीचे<br>४) भाजी<br>५) कांदा, लिंबू / कोशिंबीर<br>६) चटणी / लोणचे |

कुलसचिव
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती

Scanned By Scanner Go

रविवार (सकाळ)
वेळ (सकाळी ९.३० ते १२.३०)

१) गव्हाच्या पोळ्या (चपाती)
२) भात
३) वरण / आमटी
४) सुकी भाजी
५) रस्सा भाजी / उसळ
६) दही / ताक / कढी (मर्यादीत)
७) कांदा, लिंबू
८) चटणी / लोणचे
९) गोड पदार्थ (मर्यादीत)

रविवार (संध्याकाळ)
वेळ (सायकाळी ७.०० ते १०.००)

१) खिचडी / पुलाव / भाकर
२) कढी / आमटी / बेसन
३) पापड / तळलेली मिरची
४) चटणी / लोणचे ठेचा
५) कांद, लिंबू

(ब) उपवासाच्या दिवशीचे पदार्थ

(पूर्व सूचनेनुसार)
१) साबूदाना / खिचडी / भगर ( एक प्लेट)
२) दोन केळी / इतर फळे (सिझनानुसार)
३) एक वाटी दही किंवा ताक

बाजारातील परिस्थिती लक्षात घेता मेस कंत्राटदाराला गैरसोय होत असेल व तो विशिष्ट मेनू देण्यात व्यवहारीकतःह असमर्थ असेल तर त्याच्या लेखी विनंतीनुसार वरील मेनूत तात्पुरता बदल करण्याचे अधिकार वसतीगृह अधिक्षीकांना असेल. मात्र परिस्थिती पुर्ववत झाल्यास ही सूट काढून घेण्यात येईल.

क) मेस कंत्राटदाराने पदार्थ खाली दिलेल्या दरानुसार, मागणीनुसार (अतिरीक्त)उपलब्ध करुन द्यावे. (उदा.गेस्ट चार्ज तसेच खाजगी मागणीनुसार)

| पदार्थ | रुपये |
|---|---|
| १) चहा / कॉफी / दुध १०० मी.ली. | रु. ५.०० |
| २) उपमा / शिरा / पोहे / फराळी चिवडा १ प्लेट | रु.१५.०० |
| ३) ब्रेड ४ नग आणि लोणी / जाम | रु.२०.०० |
| ४) गेस्ट करीता शाकाहारी पुर्ण जेवण | रु.३५.०० |
| ५) गेस्ट करीता शाकाहारी पुर्ण जेवण अधिक गोड पदार्थ | रु.४०.०० |

वरील दिलेल्या दरामध्ये वसतीगृह अधिक्षिका यांचे परवानगीने वेळोवेळी योग्य तो बदल करण्यात येईल.

१६) मेस मधील कोणत्याही साहीत्याची नासधुस, तोडमोड, चोरी, अपहार इत्यादी प्रकारे झालेले नुकसाण मेस कंत्राटदाराला भरुन द्यावे लागेल.

१७) (अ) मेस सुरु झाल्याच्या पहील्या दिवसापासूनच भांडी, पाणी, खाद्यपदार्थ याबाबत स्वच्छता असणे, नौकराचे कपडे विशिष्ट गणवेशात स्वच्छ व निटनेटके असणे आवश्यक आहे. तसेच १८ वर्ष वयाच्या आतिल व्यक्तीस नोकर म्हणून कामावर ठेवू नये. त्याचप्रमाणे कंत्राटदाराने यासंदर्भातील कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करु नये. याबाबत सर्वस्वी जबाबदारी मेस कंत्राटदाराची राहील. त्याचप्रमाणे नौकराची वैद्यकीय तपासणी दर तीन महीण्यानी विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडुन करुन घेणे बंधनकारक राहील. वैद्यकीय तपासणी केल्याचे प्रमाणपत्र वसतीगृह अधिक्षिका यांना सादर करावे. याशिवाय कंत्राटदाराद्वारे मेसमध्ये काम करणारे नौकरवर्ग कार्यानिमित्य भेट देणाऱ्या व्यक्तिचे ओळखपत्राची छायांकीतप्रत आगाऊ कार्यालयाला सादर करणे आवश्यक राहील. तसेच त्यांच्यावर कोणतेही खटले किंवा शिक्षा नसल्यासंबंधी प्रमाणपत्र मेस कंत्राटदाराने सादर करणे बंधनकारक राहील.

(ब) मुलींचे वसतीगृहामध्ये नौकर म्हणून फक्त महीला किंवा मुली असणे बंधनकारक राहील.

१८) (अ) मेसमध्ये धुम्रपान, गुटका, तंबाखू तसेच अल्कोहोलयुक्त पेय इत्यादीची विक्री किंवा सेवन करता येणार नाही. तसे आढळल्यास योग्यती कार्यवाही करण्यात येईल.

(ब) मेस कंत्राटदाराला मुलींचे वसतीगृहातील/वसतीगृहाशी संबंधीत व्यक्ती व्यतीरिक्त कुठल्याही व्यक्तीस वसतीगृहातील मेसमध्ये जेवण देता येणार नाही.

१९) विद्यापीठाचे कर्मचारी / अधिकारी व प्राधिकारणीच्या कोणत्याही सदस्यास व त्याचे कुटूंबातील व्यक्तीस ठेका घेता येणार नाही.

२०) मेसमध्ये कंत्राटदाराची आणि मेसमधील नौकर वर्गाची वागणूक सहकार्याची आणि सौजन्यपुर्ण असली पाहीजे.

२१) मेसमध्ये काम करतांना एखाद्या कामगारास इजा किंवा दुखापत झाल्यास त्याची सर्व जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील.

२२) वसतीगृहाची मेस चालवत असतांना इमारत, फर्निचर व मेसमध्ये वापरण्यात येणारे भांडे व इतर वस्तूचे नुकसान झाल्यास संबंधीत कंत्राटदाराकडुन वसूल केल्या जाईल किंवा त्याचे विनंतीनुसार अनामत रक्कमेतून वसूल करण्यात येईल.

कुलसचिव
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

Scanned By Scanner Go

२३) वरीलपैकी कोणत्याही अटीचा भंग झाल्यास त्यासंदर्भात मेस कंत्राटदाराचे म्हणने ऐकून घेवून सदर कंत्राट रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठ मेस समितीस/कुलसचिव यांना राहील.

२४) कंत्राटदाराने त्याच्या सर्व कर्मचाऱ्याबाबतीत संपुर्ण कामगार कायदे, स्थायी आदेशाचे वेळोवेळी पालन करणे बंधनकारक राहील.

२५) मेस कंत्राटदाराने मेसमधील कोणताही आर्थिक व्यवहार लेखी स्वरुपात करावा आणि प्रत्येक महिण्याला त्याची तपासणीसाठी वसतीगृह कार्यालयास सादर करावे.

२६) मेस कंत्राटदाराने मेसमध्ये जेवण घेणाऱ्या विद्यार्थीनीची दैनंदिन स्वाक्षरीची नोंद ठेवावी. विद्यार्थीनीच्या नोंद नसेल तर विद्यार्थीनीला मेसची सेवा पुरविण्याबाबतचा कोणताही दावा ग्राह्य मानला जाणार नाही.

रु.१३००/- प्रति विद्यार्थीनी/महीण्याप्रमाणे मुलींचे वसतीगृहातील मेस कंत्राट दिनांक २९.८.२०१९ ते ३०.६.२०२० पर्यंत राहील.

वरील सर्व अटी व शर्ती मी काळजीपुर्वक वाचून व समजून घेतल्या असून त्याचे मी तंतोतंत पालन करीन

दिनांक : 29/8/19

Witness

1) सौ. दैस
सौ. कल्पना. व. दैस

2) डी. एन. भिंगारे

Party No. 1 (Shri G.B.Jadhao)
(Contractor)

Party No.2 — Registrar
Sant Gadge Baba
Amravati University, Amravati.

Prepared by

WARDEN
GIRLS' HOSTEL
Sant Gadge Baba Amravati University
Checked by 29.8.19

Approved By Hon'ble V.C. Dt.14.8.2019 authorised by M.C.Vide Item No.187 Dt.31.7.2014

Scanned By Scanner Go